महाराष्ट्र पोलीस

# पोलीस अधीक्षककार्यालय जालना
## चालक पोलीस शिपाई भरती २०२२-२०२३
## प्रेस नोट

पोलीस अधिक्षक जालना या घटकाचे आस्थापनेवरील चालक पोलीस शिपाई (२३) रिक्त पदासाठी सन २०२२-२०२३ ची भरती प्रक्रिया अंतर्गत उमेदवारांची मैदानी चाचणी दिनांक २४.०६.२०२४ ते २७.०६.२०२४ या दरम्यान पोलीस मुख्यालयाचे परेडग्राऊंडवर घेण्यात आली होती सदर चाचणी मध्ये पात्र व उपलब्ध झालेल्या उमेदवारांची चालक पोलीस शिपाई पदाची कौशल्य चाचणी दिनांक २९.०६.२०२४ ते ०३.०७.२०२४ व ०८.०७.२०२४ रोजी घेण्यात आली होती. मैदानी चाचणी व चालक कौशल्य चाचणीमध्ये पात्र व उपलब्ध झालेल्या उमेदवारांपैकी १:१० प्रमाणे उमेदवाराची प्रवर्गनिहाय यादी या कार्यालयाचे संकेतस्थळावर दिनांक ०८/०७/२०२४ रोजी प्रसिध्द करुन सदर उमेदवारांना दिनांक १४/०७/२०२४ रोजी सकाळी ०७.०० वाजता जे.ई.एस.कॉलेज, दुर्गामाता मंदिर रोड जालना येथे लेखी परिक्षेकरीता उपस्थीत राहण्याबाबत सुचीतकरण्यात आलेले आहे.

दिनांक १४/०७/२०२४ रोजी घेण्यात येणारी लेखी परीक्षाही अत्यंत पारदर्शक पध्दतीने पार पाडण्याच्या दृष्टीने लेखी परिक्षेस पात्र उमेदवारांना खालील प्रमाणेसूचना देण्यात येत आहे.

**उमेदवारांसाठी सुचना :-**

१) लेखी परिक्षेसाठी पात्र असलेल्या उमेदवारांनी रविवार, दिनांक १४/०७/२०२४ रोजीसकाळी ०७.०० वाजता उपरोक्त नमुद ठिकाणी लेखी परिक्षेसाठी हजर राहावे.

२) सर्व उमेदवारांनी वेळेमध्ये दिलेल्या ठिकाणीहजर राहणे बंधनकारक आहे, सकाळी ०९.१५ वाजे नंतर परिक्षेसाठी उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत परिक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येणार नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३) उमेदवारांनी परिक्षेसाठी येतांना पासपोर्ट साईज फोटो, शासकिय ओळखपत्र, महाआयटीकडुन यापूर्वी देण्यात आलेले प्रवेशपत्र, लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र, या कार्यालयाकडुन शारिरीक चाचणीवेळी देण्यात आलेले चालक पोलीस भरती ओळखपत्र न चुकता सोबत आणणे बंधनकारक आहे.

४) प्रत्येक परिक्षाहॉल मध्ये एक घडयाळ लावण्यात येणार असल्याने उमेदवाराने घडयाळ व कोणतेही किंमती साहित्य सोबत आणु नये.

५) उमेदवारांना काळया शाईचे पेन परिक्षेचेवेळी या कार्यालयाकडुन पुरविले जाणार असल्याने मुद्दाक्रमांक ३ व ४ मधील नमुद कागदपत्रांव्यतिरिक्त इतर कोणतेही साहित्य परिक्षा केंद्रावर घेवुन येण्यास सक्त मनाई आहे.

६) उमेदवारांनी मोबाईल, वॉच, स्मार्ट वॉच, गणकयंत्र, इतरकोणतेही ब्ल्युटुथ यंत्र अगर इलेक्ट्रॉनिक यंत्र जवळ बाळगण्यास सक्त मनाई आहे, तसे निर्देशनास आल्यास, अथवा उमेदवार इतर कोणत्याही गैरमार्गाचा अवलंब करीत असल्याचे आढळून आल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई केली जाईल व संबंधीत उमेदवारास पुढील चालक पोलीस भरती प्रक्रियेतुन तात्काळ अपात्र केले जाईल.

७) उमेदवारांचे पालक व मित्रांना परिक्षाकेंद्राच्या परिसरात प्रवेशबंदी आहे.

८) सदरची लेखी परिक्षाही अत्यंत पारदर्शक पध्दतीने व सिसीटिव्ही कॅमेरा तसेच व्हिडिओ कॅमेराचे निगरानीखाली होणार असून उमेदवारांच्या प्रत्येक हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन घेण्यात येणार असल्याने उमेदवारंनी कोणत्याही प्रकारच्या गैरप्रकाराचा अवलंब करू नये. तसे आढळुन आल्यास उमेदवारांना परिक्षेतुन बाद केले जाईल व भारतीय न्याय दंडसंहिता प्रमाणे दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

९) जे उमेदवार १३/०७/२०२४ चे संध्याकाळी उशिराने येतील त्यांची राहण्याची सोय शोभा प्रकाश मंगल कार्यालय बस स्टँड जवळ जालना येथे मोफत करण्यात आली आहे.

(अजय कुमार बसल)
पोलीस अधिक्षक जालना

Scanned with OKEN Scanner